नि.दि.दावा. क्र. ६८/२०१४
शामराव वि. विष्णू.
**MHKO150002482014**

## निशाणी क्रमांक ५२ खालील आदेश.

**१.** वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्ती करण्यासाठी दिलेला आहे.

**२.** वादीचे थोडक्यात कथन की, त्याने प्रस्तूत दाव्यामध्ये त्याच्या व प्रतिवादीच्या दरम्यान असलेला बांध काढून अतिक्रमण करु नये याबाबत प्रतिवादी विरोधात मागणी केलेली असून त्याचा पुरावा संपलेला आहे. प्रतिवादीने त्याच्या पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले असून सध्या दावा त्याच्या उलट तपासासाठी प्रलंबित आहे. वादीने नि. क्र.१३ प्रमाणे दिलेल्या अर्जावरुन दावा मिळकतीची दि.२३.११.२०१५ रोजी मोजणी करण्यात आलेली असून त्याबाबत मोजणीदार महंमद पठाण याची नि. क्र.४४ प्रमाणे साक्ष नोंदवली असता, त्याने प्रतिवादीने दावा मिळकती वरती ४४.७५ चौ.मी. क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे सांगितलेले आहे. सबब, वादीला मालकी हक्कावरुन अतिक्रमित जागेचा ताबा मागण्यासाठी अर्ज कलम ३ ते ७ मधील मजकूरा प्रमाणे आवश्यक दुरुस्ती करायची आहे. वादीची मागणी कायदेशीर व आवश्यक असून सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयास मदत होणार असल्यामुळे तसेच सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल होणार नाही. त्यामुळे वादीने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**३**. प्रतिवादीने नि. क्र.५३ प्रमाणे लेखी म्हणणे सादर करुन वादीच्या अर्जास तीव्र आक्षेप नोंदविला आहे. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे, वादीने अर्ज कलम ३ ते ५ मधील मजकूर चुकीचा व खोडसाळपणाने नमूद केलेला असून ताबा मागितलेल्या जागेचे योग्य रितीने मूल्यांकन केलेले नाही. वादीने अर्ज कलम ४ मध्ये मागितलेली मागणी अतिक्रमण ताब्या बाबतची असून वादीने दाव्यामध्ये झालेल्या वाटपा प्रमाणे वहिवाट असल्याचे नमूद केलेले आहे. वादीने मागितलेली आज्ञात्मक मनाई हुकूमाची मागणी मुदत अधिनियम १९६३ च्या परिच्छेद ११३, ६४ आणि ६५ प्रमाणे मुदतीत नाही. वादीने दावा दाखल केल्यानंतर

नवीन कारण घडल्यास त्याला नवीन दावा दाखल करणे आवश्यक आहे. प्रस्तूत दाव्यात प्रतिवादीने त्याचे शपथपत्र दाखल केल्यानंतर वादीने उलट तपासासाठी ब–याच मुदती घेतल्यानंतर कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय प्रस्तूत अर्ज दाखल केलेला आहे. वादीने केलेली मागणी दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल करणारी असून प्रतिवादीच्या कायदेशीर हक्काला क्षती पोहोचवणारी आहे. वादीची मागणी मुदतबाहय व चुकीची असल्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**४.** वादी व प्रतिवादीच्या वकिलांचा विस्तृत युक्तिवाद ऐकला. वादीच्या वकिलांनी प्रस्तूत अर्जाद्वारे वादीने केलेली मागणी दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयास उपयुक्त असून मूळ दाव्यामध्ये कोणताही बदल होत नसल्याचे सांगितले आहे. त्यांनी अतिक्रमणाची बाब वादीचा साक्षीदार महंमदहनिफ पठाण याच्या पुराव्यातून सिध्द झाल्यामुळे वादीला दाव्यामध्ये दुरुस्ती करणे गरजेचे असल्याचे सांगितले आहे. त्यांनी सदर मोजणीदाराने नि. क्र.४४ वरती सन २०१५ मध्ये सादर केलेल्या नकाशात अतिक्रमित क्षेत्राबाबत स्पष्टीकरण दिलेले नव्हते. सदर बाब त्याच्या दि.०४.०७.२०२२ रोजी झालेल्या उलट तपासा दरम्यान सिध्द झालेली आहे. त्यामुळे वादीने केलेली मागणी ३ वर्षांच्या आतमध्ये मुदतीत केलेली असल्यामुळे कायदेशीर प्रकरणांची गुंतागुंत टाळण्यासाठी न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**५.** वादीच्या वकिलांनी त्यांच्या युक्तिवादाच्या पृष्ठतेसाठी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या बी.के.नारायण पिलाई वि. परमेश्वरन पिलाई व इतर या न्यायनिर्णयात मा. न्यायालयाने अधोरेखित केलेल्या ए.के.गुप्ता ॲन्ड सन्स वि. दामोदर व्हॅली कार्पोरेशन ***(१९९६(१) एस.सी.आर.७९६१),*** राजेशकुमार अगरवाल व इतर वि. के.के.मोदी व इतर या न्यायनिवाडयाचा संदर्भ दिला आहे. मा. न्यायालयाने वरील ए.के. गुप्ता या न्यायनिर्णयामध्ये सर्वसाधारणपणे नवीन कारणासाठी मुदतबाहय दावा दुरुस्ती मंजूर करता येऊ शकत नसले तरी दुरुस्तीमुळे कोणतेही नवीन कारण उद्भभवून नवीन कारण निर्माण होत असल्यास मुदतीची बाधा होत असली तरी दुरुस्तीची परवानगी देणे न्यायोचित असल्याचा निष्कर्ष नोंदविला आहे. तर राजेशकुमार या न्यायनिवाडयात जरी दाव्याचे

कामकाज चालू झालेले असले तरी वादमुद्दयाचे अंतिमतः निराकरण होणे गरजेचे असून इतर बाजूला कोणतीही हानी पोहोचवत नसल्यास अर्ज मंजूर करणे न्यायोचित असल्याचा निर्वाळा दिला आहे.

**६.** प्रतिवादीच्या वकिलांनी वादीने प्रस्तूतचा अर्ज विलंबाने दाखल केलेला असल्यामुळे नामंजूर करण्याची विनंती केली आहे. त्यांनी प्रस्तावित दुरुस्तीचा आणि वादीने केलेल्या मागणीचा कोणताही संबंध नसल्याचे सांगितले आहे. त्यांनी वादीची मागणी मुदतबाहय असून अर्ज मंजूर केल्यास दाव्याचे मूळ स्वरुप बदलून प्रतिवादीचे नुकसान होत असल्याचे सांगितले आहे. त्यांनी वादीने सदरचा अर्ज त्याचा पुरावा संपल्यानंतर प्रतिवादीचा पुरावा दाखल झाल्यानंतर कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय विलंबाने दाखल केलेला नाही. त्यामुळे त्यांनी वादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**७**. प्रतिवादीच्या वकिलांनी त्यांच्या युक्तिवादाच्या पृष्ठतेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या महाराष्ट्र राज्य वि.आंब्या काळया म्हात्रे (मयत) तर्फे वारस, ***(२००९ (१) एम. एल. जे. ७८१)*** आणि महादेव भांजे वि. बालाजी पठाडे ***(२०१२ (७) आॅल. एम. आर. ५६४)*** या न्यायनिर्णयांचा संदर्भ दिला आहे. मा. न्यायालयाने वरील आंब्या काळे या न्यायनिर्णयामध्ये सर्वसाधारणपणे दाव्यातील दुरुस्ती दावा दाखल करण्यापूर्वीच्या घटनांशी संबंधित असल्यास न्यायालयाने सदर मागणी मुदतीमध्ये आहे किंवा नाही पाहणे आवश्यक असल्याचा निष्कर्ष नोंदविलेला आहे. तर महादेव या न्यायनिर्णयात साक्षीदाराचा पुरावा सादर केल्यानंतर खटल्यास सुरवात होत असल्याचा निष्कर्ष नोंदवण्यात आलेला आहे. सद बाब दोन्ही विधीज्ञांनी विवादीत केलेली नाही.

८. वादीच्या कथना प्रमाणे त्याने मागितलेली प्रस्तावित सुधारणा दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयासह कायदेशीर प्रक्रियेची गुंतागुंत टाळण्यासाठी मंजूर करण्याची आवश्यक आहे. याउलट प्रतिवादीच्या कथना प्रमाणे वादीने सदर अर्ज विलंबाने व कोणत्याही सबळ कारणाशिवाय दाखल केलेला नसल्यामुळे नामंजूर होण्यास पात्र असल्याचा युक्तिवाद केला आहे.

९. वादीने दाखल केलेल्या अर्जाचे बारकाईने निरीक्षण केले असता, वादीने त्याचा साक्षीदार महंमद पठाण याच्या पुराव्यातून सिध्द झालेल्या क्षेत्राबाबतचा ताबा मिळण्याची प्रस्तावित दुरुस्तीद्वारे विनंती केली आहे. वादीने सदर साक्षीदाराचा पुरावा दि.०४.०७.२०२२ रोजी पुर्ण होऊन देखील प्रस्तूत अर्ज दाखल करेपर्यंत कोणतीही तत्परता दाखवलेली नाही. प्रतिवादीच्या कथना प्रमाणे वादी हा ताब्याची मुदतबाहय मागणी करत आहे. सदर बाबीचा विचार केला असता, वादीचा साक्षीदार महंमद याच्या सरतपासामध्ये त्याने प्रतिवादीने केलेल्या अतिक्रमित क्षेत्राची टिप नकाशामध्ये नजरचुकीने नमूद केलेली नसल्याचे सांगितले आहे. त्याने पुढे, प्रतिवादीने ४४.७५ क्षेत्रावरती अतिक्रमण केल्याचे मोजणीमध्ये दिसून आल्याचे सांगितले आहे. त्या अनुषंगाने वादीने प्रस्तूतची मागणी केलेली आहे.

१०. प्रतिवादीच्या आक्षेपा प्रमाणे वादीची सदर मागणी ही मुदतबाहय आहे. त्या अनुषंगाने प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे सदर मागणी मुदतीच्या कायद्याच्या परिच्छेद क्र.११३, ६४ व ६५ प्रमाणे मुदतीत नाही. मुदत कायद्याच्या परिच्छेद क्र.६४ प्रमाणे वादी हा त्याच्या पुर्वीच्या ताब्याच्या अनुषंगाने जमीन मिळकतीची मागणी त्याला बेदखल केल्यापासून १२ वर्षांच्या आतमध्ये मागू शकतो. तर परिच्छेद क्र.६५ ची तरतूद प्रतिकूल ताब्यासाठी लागू होत असून परिच्छेद क्र.११३ मधील तरतूदी या दाव्यासाठी विशेष मुदत निश्चित केलेली नसल्यास लागू पडतात.

११. वादीने अतिक्रमित ताब्याची मागणी करण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती मागितलेली आहे. वादीने सन २०१४ साली प्रस्तूत दावा दाखल केलेला असला तरी प्रतिवादीने किती क्षेत्रावरती अतिक्रमण केले आहे ही बाब प्रथमतः साक्षीदार महंमद याच्या पुराव्यातून दि.०४.०७.२०२२ रोजी पटलावरती आलेली आहे. वादीने त्यानंतर मुदतीच्या कायद्याच्या कलम ६४ प्रमाणे तीन वर्षांच्या आतमध्ये सदर ताब्याची मागणी करुन त्या अनुषंगाने आवश्यक दुरुस्ती मागितलेली आहे.

१२. वादीने प्रस्तूतचा दावा हा कायम स्वरुपी मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे.

वादीने दावा दाखल केल्यानंतर दिलेल्या न्यायालयीन आयुक्ताच्या नेमणूकी बाबतच्या अर्जावरुन दावा मिळकतीची मोजणी होऊन अतिक्रमित क्षेत्राबाबत खुलासा झालेला आहे. त्यामुळे वादीला नवीन दावा दाखल करण्यास कारण घडले असा निष्कर्ष निघू शकत नाही. अतिक्रमणाची बाब ही प्रस्तूत दावा प्रलंबित असताना न्यायालयाच्या आदेशाने झालेल्या मोजणी दरम्यान पटलावरती आलेली आहे. त्यामुळे वादीची मागणी मुदतबाहय असल्याबाबतचा प्रतिवादीचा आक्षेप मान्य करता येऊ शकत नाही.

**१३**. प्रस्तूत दावा हा प्रतिवादीच्या उलट तपासासाठी प्रलंबित आहे. वादीने त्याचा व साक्षीदाराचा पुरावा झाल्यानंतर सदर अर्ज तातडीने दाखल करण्यास त्याला काय अडचण होती याबाबतचा खुलासा केलेला नाही. तसेच वादीचा अर्ज मंजूर केल्यामुळे प्रतिवादीचे कशाप्रकारे नुकसान होणार आहे याबाबतचा देखील कोणताही खुलासा त्याने केलेला नाही. त्यामुळे केवळ वादीने विलंबाने दुरुस्तीची मागणी केल्यामुळे त्याचा अर्ज फेटाळणे न्यायोचित ठरत नाही.

**१४**. प्रतिवादीने दाखल केलेल्या वरील अांब्या या न्यायनिवाडयातील बाबी या दावा दाखल करण्याच्या घटनांशी संबंधित असून त्याबाबत दुरुस्ती करायची असल्यास त्यास मुदतीची बाधा येत आहे किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे. परंतु, प्रस्तूत दाव्यात मागितलेली दुरुस्ती ही साक्षीदाराच्या उलट तपासातून पटलावरती आलेली आहे. त्यामुळे प्रतिवादीला त्याने दाखल केलेला वरील न्यायनिवाडा उपयुक्त ठरत नाही. तसेच वादीने देखील दावा प्रतिवादीच्या उलट तपासासाठी प्रलंबीत असल्याचे नाकारलेले नाही. त्यामुळे केवळ खटल्यास सुरवात झाल्याच्या कारणा वरुन दाव्याच्या अंतिम निराकारणासाठी आवश्यक असणारी दुरुस्ती नाकारणे न्यायोचीत ठरत नाही. सबब, वादीने दाखल केलेले वरील बी.के. नारायण व राजेशकुमार हे न्यायनिवाडे त्याला उपयुक्त ठरतात.

१५. न्यायालयाने दुरुस्तीचे अर्ज मंजूर करताना ते सिध्द होत आहेत किंवा नाही हे पाहणे आवश्यक नसून न्यायाच्या अंतिम निर्णयासाठी आवश्यक असलेली दुरुस्ती मंजूर

करणे गरजेचे आहे. वादीचा अर्ज मंजूर केल्यामुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादीला लेखी कैफियतीमध्ये दुरुस्ती करुन आवश्यक तो बचाव घेऊन पुरावा सादर करता येऊ शकतो. परंतु, अर्ज नामंजूर केल्यास सदर दाव्याचे गुणदोषावरती अंतिमतः निराकरण होणारे नसून न्यायालयीन गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. सबब, वरील विवेचना वरुन न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर करणे आवश्यक असून वादीने केलेल्या विलंबा बाबत त्याला दंड करणे न्यायोचित ठरते. सबब, मी वरील विवेचनावरुन खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

**<u>आदेश</u>**

१. अर्ज १,०००/– रुपयांच्या दंडावरती मंजूर करण्यात येतो.

२. वादीने पुढील तारखेला प्रतिवादीला दंडाची रक्कम दिल्यानंतर अर्जातील मागणी प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करुन आवश्यक त्या प्रती सादर कराव्यात.

३. प्रतिवादीला वादीने दुरुस्ती केल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे त्याच्या लेखी कैफियतीमध्ये बदल करण्याची सवलत असून त्याने पुर्तता करावी.

४. वादी व प्रतिवादीने आदेशाची नोंद घेऊन पुर्तता करावी.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

जे. ओ. कोड–एम.एच.०२८९७

दिनांक – ०२.१२.२०२४. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.